# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

## आजपर्यंत विद्यापीठांनी संयुक्त कृषि संशोधन व विकास समितीव्दारे संशोधन शिफारशी केलेले पिकनिहाय तंत्रज्ञान

| | | |
|---|---|---|
| **पीक व वाण** | : | **हळद** |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१६** |
| लागवडीविषयी तंत्रज्ञान व शिफारशी | : | १. हळद या पिकापासून अधिक उत्पादन व नफा मिळविण्यासाठी हळकुंडाच्या डोळ्यापासून रोपे तयार करुन लागवड करावी.<br>२. कोकण विभागात सुपारी बागेतून अधिक उत्पादन व निव्वळ नफा मिळविण्यासाठी सुरण किंवा आले किंवा हळद या पिकाची आंतरपिक म्हणून लागवड करावी. |
| खत व्यवस्थापनाबद्दल शिफारशी | : | कोकण विभागात हळद या पिकापासून अधिक उत्पादन आणि नफा मिळण्यासाठी जमिनीची मशागत करतेवेळी शेणखत २५ टन/हे. आणि लागवडीनंतर ४५ दिवसांनी प्रती हेक्टरी १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व १५० किलो पालाश आणि ९० दिवसांनी १०० किलो नत्र प्रती हेक्टरी देण्यात यावे. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१७** |
| इतर | : | कृषि अर्थशास्त्र :<br>दक्षिण कोकणात हळद ही सुक्या हळकुंडाच्या स्वरुपात न विकता पावडर करुन विक्री केली असता प्रती क्विंटल रु. ६०९०/- इतका जास्त निव्वळ नफा मिळाल्याचे आढळून आले. त्यामुळे हळकुंडावर प्रक्रिया करुन पावडर स्वरुपात विकण्याकरिता शेतकऱ्यांना आत्मा आणि कृषि विज्ञान केंद्रांमार्फत प्रोत्साहित करण्याची शिफारस करण्यात येते. |